TY BMM (Marathi) SEM-V Editing



QP Code : 11262

(२½ तास) (एकूण गुण : ७५)

सूचना : (१) सर्व प्रश्न अनिवार्य आहेत.

(२) खालील सूचना काळजीपूर्वक वाचा.

१. खालील उताऱ्याचे संपादन करुन २०० शब्दात पुर्नलेखन करा. तसेच सहा शब्दांपर्यंत शिर्षक आणि अनुरुप छायाचित्र सूचवा. १५

बगलोरमध्ये एक मणीपुरी मुलला मारहण झाल्याच्या दुसऱ्या दिवशी मुळ नागालँडच्या सायबर सिटीमधे काम करणाऱ्या दोन बीपीओ कर्मचाऱ्याना बुधवरी रात्री गुरगाव इथे गावकऱ्यांनी शिविगाळ करत जबर मारहाण केली. उत्तर पूर्वोत्तर राज्यातन आलेल्या व्यक्तीच्या विरोधात हल्ल्यांचे प्रमाण दिवसोदिवस वाढत आहे. क्रीकेट बट आणि हाकी स्टिकनी केलेल्या हल्लात अवांग निमी २२ वर्ष आणि अलोतो चिसी २५ वर्ष या दोघाना गंभीर जखमा झाल्या आणि तयांची शुध्द हरपली. पण एव्हढा होऊनही हल्लेखोर थांबले नाहित. हल्लेखोरांनी अवांगच्या डोकयावरचे केस कापून त्यांची वीटंबना केली आणि त्यांना धमकि दिली. हल्लेखोरानी त्यांना सांगितले कि उत्तर पूर्वेतन आलेल्या लोकांना ताबडतोब इथून चालते होण्यास सागा. घोरी गावातील सिकंदरपूरा भागात हा हल्ला झाला तिथे उत्तर पूर्वेतून आलेले सुमारे शंभर लोक राहतात. सायबर सिटी पासून फक्त एक किमी अतरावर हा भाग आहे. पोलिसानी गुरुवारी खूनाचा प्रयत्न केल्याचा गुनाह सात लोकांवर दाखल केला असला तरी अदाप कोणालाही अटक करणयात आलेली नाही. अवांग आणि अलोटो यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल असन त्यांच्या डोक्याला तसच हात पायाला गंभीर स्वरुपाचा जखमा झाल्या आहेत. घोरी गावातील सिकंदरपूरा इथे अवांग आणि अलोतो भाड्याच्या घरात राहत होते. बुधवार रात्री ११ च्या समरास या दोघानी डीएलएफ फेस वन इथ दारुच्या बाटलया वीकत घेतल्या. हे दोघ घरी परत येत असतान त्याना परिचीत असलेल्या गावातील तरुणाशी गाठ पडली. या दोघांनी त्यांना सोबत दारू पिण्यास बोलावल आणि आणखी काही स्थानिक तरुण त्यात सहभागी झाल. पोलिसानी दिलल्या माहीतीनुसार दारू पितांना स्थानिक तरुण आणि बीपीओमध्ये काम करणाऱ्या या दोघांमध्ये वादावाद झाली. त्यानंतर स्थानीक तरुणान या दोघाना हाकी स्टीक आणि क्रिकेट बटने जबर मारहण केली त्यात हे दोघे जखमि होऊन खाली कोसळल. स्थानक तरुणानि अवांगला त्याच्या घराबाहर फेकलं तर अलोतोला त्याच्या बहीणिने घरी नेल. स्थानीक तरुणानी उत्तर पूर्वेतून आलेल्या लोकांना सिकंदरपूरा ताबडतोब सोडण्यास धमकावलं आणि त्यानी अवांगचे केसही कापल अस त्याच्या नातेवाइकने सांगीतल. पोलिसानि या परकरणी गूनाह दखल केला आहे आणि जखमी तरुणांची वैदकिय तपसाणी करण्यात आली. डीएलएफ एसीपी दलबीर सिंग यांनी सांगीतल कि सात आरोपीन पकडणयासाठी छापे टाकण्यात येत आहेत.

munotes.in



Scanned by CamScanner

२. (अ) राष्ट्रीय स्तरावरील दैनिकाच्या संपादकीय विभागाची रचना आकृतीसंबंधासह स्पष्ट करा. ६
(ब) उपसंपादकाची कार्ये कोणती ? विस्तारपूर्वक लिहा. ६

किंवा

(अ) पान मांडणी (page design) स्पष्ट करा. पृष्ठ बांधणी (page makeup) मधील घटकांची चर्चा करा. ६
(ब) वृत्तांकना संबंधीत उलट्या त्रिकोणाची (inverted pyramid) संकल्पना स्पष्ट करा. ६

३. छायाचित्रे आणि इन्फो ग्राफिक्सचे महत्त्व विशद करा. छायाचित्रे निवडीचे निकष कोणते ? १५

किंवा

मथळ्यांचे विविध प्रकार आणि त्याचे बातमीशी साधर्म्य यावर भाष्य करीत मथळे लिखाणासाठी मार्गदर्शक तत्त्वे सूचवा.

४. खालील परिच्छेद काळजीपूर्वक वाचा - १५
(अ) राष्ट्रिय दैनिकाच्या पहिल्या पानावर परिच्छेदाचे स्थान निश्चित करा.
(ब) स्थान निश्चितीसाठीचे समर्थन द्या.
(क) शिर्षक द्या.
(ड) कोणतेही पाच.

(१) मुंबई : नो एण्ट्री नियमांचा भंग करणाऱ्या बाईक स्वारांवर मुंबई वाहतुक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. पोलिसांनी आता बाईक स्वारांवर दखलपात्र गुन्हे नोंदवण्याचे ठरवले आहे.

(२) नवी दिल्ली : भविष्य निर्वाह निधी संघटनेने आता प्रथमच सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या समभागांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी पाऊल उचलले आहे. भविष्य निर्वाह निधी संघटना सात लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे व्यवस्थापन करते.

(३) मुंबई : भाजपाने महाराष्ट्रात सत्ता स्थापनेच्या दृष्टीकोनातून शिवसेनेचा पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं सूत्रांनी गुरुवारी सांगितले पण पाठिंबा देण्यासंदर्भात सेना द्विदा मनस्थितीत आहे.

(४) नवी दिल्ली - स्वतंत्र विदर्भ राज्याचा मूद्दा भाजपाच्या मूख्यमंत्री पदाच्या निवडीवर प्रभाव टाकू शकतो असा विश्वास पक्ष नेतृत्वातील काही जणांना वाटत आहे.

(५) नवी दिल्ली : इन्स्पेक्टर राज संपविण्यासाठी आणि उद्योग व्यवसाय करणे सूलभ व्हावे या दृष्टीकोनातून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कामगार कायदयात सूधारणा करण्यास सूरुवात केली आहे.

munotes.in

(६) सूरत वापी येथील गणिती ग्रंथ ठक्कर यांना जगातील सर्वात वेगवान गणकयंत्र (calculator) म्हणून गौरवण्यात आले आहे.

(७) नवी दिल्ली : वादग्रस्त पंच डॅरेल हेअर यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची धमकी हरभजन सिंगने दिली आहे.

५. टीपा लिहा (कोणतीही तीन) :-

(अ) शैली पूस्तिका

(ब) कम्प्यूटर युगातील एडिटिंग

(क) लिखाणाची मार्गदर्शक तत्त्वे

(ड) छायाचित्रे क्रॉप करणे

(इ) विरामचिन्हांची यथोचितता (relevance)

---

munotes.in
VIDYAVARDHINI TRUST'S BHASKAR WAMAN THAKUR CO

Scanned by CamScanner